तहसिलदार संवर्गातील अधिका-यांची
बदलीने पदस्थापना

**महाराष्ट्र शासन**
**महसूल विभाग**
**शासन आदेश क्र.बदली-२०२६/प्र.क्र.२१४/आस्था-३**
(ई-ऑफिस क्र.१७३८९९२)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १७.०७.२०२६

**संदर्भ**:- १. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५

**शासन आदेश:-**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४(४) व ४(५) मधील तरतुदींनुसार खाली नमूद केलेल्या तहसिलदार संवर्गातील अधिकाऱ्यांना प्रशासकीय कारणास्तव त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविण्यात आलेल्या पदावर सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने पदस्थापना देण्यात येत आहे.

| **क्र.** | **अधिकाऱ्याचे नाव** | **सध्याची पदस्थापना** | **बदलीनंतरची पदस्थापना** |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | श्री.सुरेश नामदेव कोळी, तहसिलदार | तहसिलदार (सर्वसाधारण) जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव | **अपर तहसिलदार, दोंडाईचा, ता. शिंदखेडा, जि. धुळे या रिक्त पदावर** |

२. सदरील आदेश तात्काळ अंमलात येत असून उक्त नमूद अधिकाऱ्यांना कार्यरत पदावरून या आदेशान्वये एकतर्फी कार्यमुक्त करण्यात येत आहे. श्री.सुरेश नामदेव कोळी, तहसिलदार यांनी त्यांना देण्यात आलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी दि.१७.०७.२०२६ (म.नं.) रोजी तात्काळ रूजू व्हावे.

३. उपसंचालक, केंद्रीय निवडणुक आयोग, नवी दिल्ली यांची प्रेस नोट क्र. ECI/PN/०८६/२०२६, दिनांक १४.०५.२०२६ अन्वये "विशेष मतदार याद्यांचे पुर्ननिरिक्षण" कार्यक्रम घोषित केला असून सदर कार्यक्रमाच्या वेळापत्रकानुसार महाराष्ट्र राज्यात दिनांक २०.०६.२०२६ ते दिनांक २९.०६.२०२६ या कालावधीत तयारी आणि प्रशिक्षण आयोजित

करण्यात आले आहे. तर, सदर कार्यक्रम दिनांक ३०.०६.२०२६ पासून दिनांक ०७.१०.२०२६ पर्यत राबविण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमाकरीता तहसिलदार संवर्गातील अधिका-यांना "सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी" म्हणून घोषित करण्यात आले आहे. परिणामी, "सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी" तथा तहसिलदार संवर्गात रिक्त असलेली पदे तातडीने भरणे अनिवार्य आहे. प्रस्तुत पदस्थापनेस अपर मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांची सहमती प्राप्त झालेली आहे.

४. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळांतील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियमांनुसार दिलेल्या विहित कालावधीत संबंधित अधिकारी यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होण्याची दक्षता घ्यावी. अन्यथा पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास, त्यांचा **अनुपस्थितीचा कालावधी हा "अकार्यदिन" *(dies non)* म्हणून गणला जाईल**, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

५. संबंधित अधिकाऱ्यास शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करू नये. तसेच, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम-३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने बदली झालेल्या अधिकाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारु नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास ते संबंधित अधिकाऱ्यांना मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत.

६. संबंधित अधिकारी यांनी सदरहू आदेशानुसार तात्काळ पदस्थापनेच्या पदावर रूजू न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लघंन करणारी असल्यामूळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांचे विरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

७. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२६०७१७१२४०११६२४८ असा आहे. हे शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MAHESH ASHOKRAO VARUDKAR

Digitally signed by MAHESH ASHOKRAO VARUDKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT,
2.5.4.20=D93C4961D98086877A4048296211D7AF97ECFD40D7967C43D20B360D83CE0FA6, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=7EBBBC3712E8D459EF90BF7AAE4EA46E9CAEBDD50CFECDE2EE7CE0454FA0416A, cn=MAHESH ASHOKRAO VARUDKAR
Date: 2026.07.17 12:41:52 +05'30'

**( महेश वरूडकर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

विभागीय आयुक्त, नाशिक.

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास/गृहनिर्माण) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२

३. मा.उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क/क्रीडा व युवक कल्याण/
अल्पसंख्याक विकास आणि औकाफ) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
४. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
५. मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
६. अपर मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य
७. संबंधित जिल्हाधिकारी.
८. प्रधान महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परीक्षा), मुंबई/ नागपूर.
९. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
१०. संबंधित अधिदान व लेखा अधिकारी.
११. संबंधित आहरण व संवितरण अधिकारी.
१२. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई-३२.
१३. संबंधित तहसिलदार (संबंधित विभागीय आयुक्त यांचेमार्फत).
१४. उप सचिव (आस्था-३) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
१५. निवडनस्ती (आस्था-३).